ISSN 2231-1629
Knowledge Resonance

IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

# वर्ण व्यवस्था आणि आश्रम व्यवस्था यांचे चिकित्सक विवेचन

**डॉ. अतुल म. महाजन**
सहयोगी प्राध्यापक, तत्वज्ञान विभाग,
रेणुका कॉलेज, नागपूर.

★★★

**सारांश :** प्राचीन काळापासून समाज सुव्यवस्थित आणि सुसंघटीत राहवा या करीता भारत देषामध्ये अनेक व्यवस्था कार्यरत होत्या. या व्यवस्थापैकी वर्ण व्यवस्था आणि आश्रम व्यवस्था अषा व्यवस्था आहेत की ज्यांचा मुख्य उद्देष समाजाला सुसंघटीत आणि सुव्यवस्थित ठेवणे हा होता. परंतु वर्तमान काळात आधुनिकिकरण, विज्ञान, शहरीकरण, औद्योगीकिरण आणि पाष्चिमात्यकरण यामुळे वर्ण व्यवस्था आणि आश्रम व्यवस्था यानुसार जीवन जगणे शक्य नाही. त्याचप्रमाणे प्राचिन काळातील या व्यवस्थांमुळे अनेक समाजीक प्रष्न आणि समस्या निमार्ण झाल्या आहेत. ज्यामुळे या व्यवस्था वर्तमान काळात स्वीकार करणे योग्य नाही. प्रस्तुत लेखात आपण मनुच्या काळातील वर्ण व्यवस्था आणि आश्रम व्यवस्थेचे स्वरुप आणि त्यांचे चिकित्सक अध्ययन''वर्ण व्यवस्था आणि आश्रम व्यवस्था यांचे चिकित्सक विवेचन'' या षिक्षीका अंतर्गत करणार आहोत.

**प्रस्तावना :** प्राचीन भारतीय आणि नैतिकते संबंधित विविध ग्रंथात वर्ण आणि आश्रम व्यवस्थेबाबत विविध विवेचन दिसून येते. वेद, ब्राह्मण ग्रंथ, धर्मसूत्र, स्मृति इत्यांदीमध्ये वर्णाश्रम धर्माची विस्तृत चर्चा केलेली दिसून येते. 'धर्म' शब्दाचे अनेक अर्थ आहेत. यापैकी सुप्रसिद्ध व रूढ अर्थ म्हणजे 'हिंदू धर्म', 'मुस्लिम धर्म', 'ख्रिस्ती धर्म' अषा शब्द प्रयोगातून प्रतीत होणारा अर्थ होय. या अर्थाचा 'मानव आणि विष्व यावर नियंत्रण ठेवणारी एक अतिमानवीय शक्ती आहे याचे स्मरण ठेवून तीची आज्ञा म्हणून जीवनातील कर्म करीत राहणे' असे सांगता येईल. 'धर्म' शब्दाचा आणि त्याचा अर्थाचा इतिहास फार प्राचीन काळापासून आढळून येतो. 'धर्म' हा शब्द 'धृ' या धातूपासून निर्माण झाला असून त्याचा अर्थ धारण किंवा पोषण करणारे, टिकून धरणारे तत्व असा सामान्यतः दिसून येतो. मनु ने मुख्यतः धर्म शब्दाचा प्रयोग कर्तव्याच्या अर्थानेच केलेला आहे असे म्हणता येईल. प्रत्येक व्यक्तीला तीची कर्तव्य सहज प्राप्त असतात. व्यक्ती अंतराळात जन्मास येत नाही, तिच्याभोवती सामाजिक परिसर असतोच. त्या परिसरात समाजाच्या निती नियमांना काही स्थान प्राप्त झालेले असते. त्या स्थानाला अनुलक्षून व्यक्तीची कर्तव्य आपोआपच नियत झालेली असतात. प्राचीन काळातील वर्णाश्रमव्यवस्था एक सामाजिक आदर्ष होता. व्यक्तींच्या कर्माची त्यानुसार विभागणी होत असे. वर्ण आणि आश्रम व्यवस्थेचे स्वरूप आपण खालील प्रमाणे थोडक्यात बघणार आहोत. त्याआधी हे संषोधन कार्य करीत असतांना कोणत्या पध्दतीचा आपण अवलंब केला याचे संक्षिप्त विवेचन करू.

**संशोधन पध्दती :** प्रस्तुत शोध निबंधात आपण मनुच्या काळातील वर्ण व्यवस्था आणि आश्रम व्यवस्थेचे स्वरूप आणि त्यांचे चिकित्सक अध्ययन करणार आहोत. त्यामुळे हे संषोधन करतांता आपण विष्लेशणाच्या पध्दतीचा अवलंब करणार आहोत.

**स्वधर्म :** स्वधर्म म्हणजे स्वतःचा धर्म म्हणजेच वर्णाश्रम धर्म. मनुच्या मते विभिन्न सामाजिक वर्ग आणि आश्रमांनुसार जे कर्तव्य किंवा कर्म केले जाते त्याला वर्णाश्रम धर्म म्हणतात. प्रत्येक वर्ण आणि आश्रम हे विषिष्ट कर्तव्य करण्याकरीता सांगतात आणि ही कर्तव्य म्हणजेच त्या वर्णातील किंवा आश्रमातील सदस्यांचा स्वधर्म होय. स्वधर्मामध्ये वर्णव्यवस्था आणि आश्रम व्यवस्थेचा विचार करण्यात आलेला आहे.

**वर्ण व्यवस्था :** हिंदू समाजाच्या नैतिक नियमानुसार आणि मनूच्या काळात समाज सुव्यवस्थित आणि सुरळीत रहावा यासाठी समाज चार वर्णात विभागला गेला होता. वर्णव्यवस्थेत कर्माला महत्त्वपूर्ण स्थान आहे. प्रत्येक वर्णाचे आपले विषिष्ट कर्तव्य आहेत. 'वर्ण' शब्दाची भिन्न भिन्न अर्थ सांगण्यात आलेले आहे. 'वर्ण' शब्द संस्कृतातील 'वृत्तवरण' या शब्दापासून निर्माण झाला असून त्याचा अर्थ निवड करणे असा आहे. ऋग्वेदात वर्णाचा उपयोग रंगासाठी केलेला दिसून येतो. वर्ण एकूण चार आहे ते म्हणजे ब्राह्मण, क्षत्रिय, वैष्य आणि शुद्ध. भारतीय वर्णव्यवस्थेचा मुख्य उद्देष श्रम विभाजन हा होता. त्याचे विभाजन पुढीलप्रमाणे आहे. विद्योउपजीवि वर्ग, शासक वर्ग, व्यापारी वर्ग आणि श्रमिक वर्ग. प्रत्येक वर्णाचे आपापले विषिष्ट कर्तव्य होते. ती कर्तव्य पुढील प्रमाणे –

**1. ब्राह्मण वर्णाची कर्तव्य :–** अंतकरणावर नियंत्रण ठेवणे, इंद्रियांवर संयम ठेवणे, क्षमा, साधना, स्वाध्याय, श्रध्दा, अध्ययन, अध्यापन आणि ईष्वराचे ज्ञान प्राप्त करणे हे ब्राह्मण वर्णाची कर्तव्य आहेत. तसेच वेदांचे अध्ययन करणे, यज्ञ करणे, दान देणे व दान घेणे हे ब्राह्मण वर्णाची कर्तव्य आहे.

**2. क्षत्रिय वर्णाची कर्तव्य :–** क्षत्रियांचा संबंध शासक वर्गाषी आहे. त्यांचे मुख्य कर्तव्य तिनही वर्णाना सुरक्षा देणे आणि राज्यावर शासन करणे होय. तसेच प्रजेचे रक्षण करणे, ब्राह्मणांना दान देणे, वेदांचा अभ्यास करणे आणि भोगविलास यापासून दूर राहणे हे क्षत्रियांचे कर्तव्य आहे. गीतेनुसार शूरता, वीरता, सामर्थ्य, धैर्य, चातुर्य, युद्धापासून परावृत्त न होणे हे क्षत्रिय वर्णाची स्वाभाविक कर्तव्य आहे.

**3. वैश्य वर्णाची कर्तव्य :–** पषुपालन करणे, व्यापार करणे, शेती करणे, दान देणे ही वैष्याची कर्तव्य आहेत. सामाजिक रचनेला आर्थिक दृष्टीने सदृढ बनविणे, आयात–निर्यात करणे, सत्य व्यवहार करणे ही वैष्यांची प्रमुख कर्तव्य आहेत.

**4. शूद्र वर्णाची कर्तव्ये :–** वरील तीनही वर्णातील लोकांची सेवा करणे हे शूद्र वर्णाची कर्तव्य आहे. तिन्ही वर्णाचे सेवक म्हणून त्यांना

ओळखण्यात येते. अषाप्रकारे समाजाच्या सुव्यवस्थेसाठी तसेच विभिन्न प्रकारच्या मनुष्याच्या क्षमतेनुसार कार्याचे वाटप वर्णव्यवस्थे मागील उद्देष होता. ज्यामुळे समाजात स्थिरता सुदृढता आणि संतुलन टिकून राहत होते.

**5. आश्रम व्यवस्था :–** त्याचप्रमाणे या काळात प्रत्येक वर्णाच्या व्यक्तीच्या जीवनाच्या सर्वांगीन विकासाकरीता विभिन्न आश्रम आणि त्यांच्या संबंधीत कतर्व्यांचे पालन करण्यावर भर दिला आहे, ज्याला आश्रम धर्म असे म्हटल्या जाते. प्राचीन भारतीय समाजामध्ये आश्रम व्यवस्था प्रचलित होती. मनुष्य जीवन सुसंस्कृत आणि सुव्यवस्थित बनविण्यासाठी आश्रम व्यवस्था सारख्या संस्थेची कल्पना करण्यात आलेली होती. Encyclopaedia of Religion and Ethic मध्ये जर्मन विद्वान पॉल डायसन यांनी 'आश्रम' या शब्दाचे दोन अर्थ सांगीतले आहेत.

1. 'आश्रम' म्हणजे असे स्थान जीथे श्रम किंवा प्रयत्न केले जावू शकत असे.

2. श्रम किंवा प्रयत्न करणे. मानवी जीवनाचे अंतिम ध्येय साधण्याकरीता आश्रम धर्माचे पालन करणे हे एक साधन म्हणून मानले गेले असे. आश्रम एकुण चार आहेत. या चारही आश्रमांच्या कर्तव्यांचा

थेडक्यात विचार आपण येथे करू.

**1. ब्रह्मचर्य आश्रम :–** हिन्दू समाजात बौध्दिक आणि षिक्षित जीवन जगण्यासाठी ब्रह्मचर्य आश्रमाची व्यवस्था करण्यात आलेली होती. या आश्रमाचे पालन केल्याने विद्या आणि षिक्षा यांची प्राप्ती होत असे. मनुष्याच्या नैतिक जीवनाच्या पहील्या अवस्थेला ब्रह्मचर्य आश्रम असे म्हणतात. या आश्रमात मनुष्य 25व्या वर्षापर्यंत गुरू जवळ राहून वेदांचा अभ्यास करीत असे व संयमी जीवन जगत असे. आत्मनिरिक्षण, संतोष, विभिन्न कला आणि विज्ञानाचे अध्ययन करीत असे. ब्रह्मचर्यावस्थेतील षिक्षण आणि षिस्त व्यक्तीला भविष्यकाळातील जीवन जगण्यासाठी उपयोगी पडत असे.

**2. गृहस्थ आश्रम :–** 25 वर्षे बंहम्चर्य आश्रमाचे पालन केल्यानंतर षिक्षण पूर्ण करून व्यक्ती विवाह करून गष्हस्थ आश्रमात प्रवेष करीत असे. गृहस्थ आश्रम मानवी नैतिक जीवनाची दुसरी अवस्था आहे. हा आश्रम सर्व आश्रमाचे आधार स्थान आहे. ज्याप्रमाणे सर्व नद्या सागरात विलिन होतात त्याचप्रमाणे उर्वरीत तीनही आश्रम कुठल्या ना कुठल्या प्रकारे गृहस्थ आश्रमावर अवलंबून असतात. या आश्रमात पती–पत्नी एक–दुसर्याषी सहयुक्त होवून धर्मानुसार व्यवहार करतात. गृहस्थ आश्रमामध्ये देवऋृशी, पित आणि अतिथी ऋणाकरीता प्रयोजन करण्यात आलेली आहे. तसेच धर्म, अर्थ आणि काम या पुरू प्रार्थांची प्राप्ती सुध्दा याच आश्रमात होत असते. गष्हस्थ आश्रमाचा मुख्य उद्देष संतानोत्पत्ती करणे, धन मिळविणे, दान करणे, पत्नी आणि मुलांचे पालन–पोषण करणे, त्यांना षिक्षण देणे, समाज आणि समाजातील अन्य लोकांची सेवा करणे, इतरांना मदत करणे हा आहे. या आश्रमात व्यक्ती त्याग, प्रेम, दया आणि सहानुभूती यांचे षिक्षण घेवून आपल्या सर्व इच्छांची पूर्ति करीत असतो.

**3. वानप्रस्थ आश्रम :–** वानप्रस्थ आश्रम मनुश्याच्या नैतिक जीवनाची तीसरी अवस्था आहे. गृहस्थाश्रमाची सर्व कर्तव्ये पूर्ण केल्यानंतर मनुष्य या आश्रमात प्रवेश करतो. या अवस्थेत सर्व सांसारीक जीवनाचा त्याग करून ज्रगलात एकांतवासात राहून मनुष्य पारलौकिक जीवनाविषयी विचार करून मोक्ष प्राप्तीसाठी प्रयत्नषील राहतो. तपष्चर्या, समता, दानषीलता, अपरिग्रह आणि सर्व प्राणीमात्रांविषयी दयाबुध्दी ठेवणे हा या आश्रमाचा मुख्य उद्देष आहे. जीवनाच्या या अवस्थेमध्‍ ये मनुष्याला चिंतन, उपवास आणि आपल्या वाईट कर्माकरीता प्रायष्चित करायला पाहीजे. वानप्रस्थ आश्रम मोक्षमार्गाचे दिग्दर्षन करतो.

**4. संन्यास आश्रम :–** मनुष्याच्या नैतिक जीवनाची चौथी अवस्था म्हणजे संन्यास आश्रम होय. वानप्रस्थ आश्रमानंतर मनुष्य सन्यास आश्रमात प्रवेष करतो. ही पूर्णपणे त्यागाची अवस्था आहे. यात मनुष्य सर्व सांसारीक सुखाचा त्याग करून ईष्वर चितनात मग्न राहतो. या आश्रमात कुटुंबाविषयी, धनाविषयी, लोकांविषयी व्यक्तीला अनासक्त राहून त्याचा पूर्णपणे त्याग करावयाचा असतो. तसेच सर्व प्राणीमात्रांवर प्रेम करणे, सर्व स्वार्थांचा त्याग करणे, परोपकाराच्या भावनेने जगात मानव जीवनाच्या कल्याणकरीता प्रयत्नषील राहत असतो. या आश्रमात सन्यासी भिक्षा मागून भोजन करणे, झाडाखाली राहणे, कुणाची वस्तू न घेणे, कुणालाही विरोध न करणे, आंतरीक व बाह्य शुध्दता पाळणे, वाणीवर नियंत्रण ठेवणे, ब्रह्मचर्य व्रताचे पालन करणे आणि ज्ञानाचा अभ्यास करणे हे सर्व संन्यास आश्रमातील मनुष्याचे धर्म आहे. अशाप्रकारे मनुच्या वर्णाश्रम धर्माचे त्या काळात अनन्य साधारण महत्व होते. प्राचिन भारतीय समाजाला सुव्यवस्थित ठेवण्याकरीता वर्ण व्यवस्था आणि आश्रम व्यवस्था फलदायी आणि उपयुक्त ठरली आहे. जर्मन विद्वान पॉल डायसन यांनी Encyclopaedia of Religion and Ethics मध्ये आश्रम व्यवस्थेबाबत म्हटले आहे की, ''मानवी जीवनाच्या इतिहास ऐवढी उदात्त कल्पना कुठेच दिसून येत नाही.''

**समिक्षा :**

1. प्राचिन काळात वर्णाश्रम व्यवस्था समाजालासुसंघटित आणि सुव्यवस्थित ठेवण्याचे कार्य करीत असली तरी बदलत्या परिस्थितीमुळे आणि त्यामुळे निर्माण झालेल्या संमस्यांमुळे ही व्यवस्था वर्तमान काळात उपयुक्त ठरु शकत नाही.

2. वर्तमान काळात लोकषाहीची भावना विकसित झाल्यामुळे जीवनयापन करण्याकरीता कोणता व्यवसाय करावा यावर बंधन राहीले नाही. त्यामुळे केवळ जन्मच्या आधारावर वर्ण व्यवस्थेचा स्वीकार करण लोकशाही आणि मानवी समान तेच्या भावनेच्या विरूध्द आहे

3. डॉ. आंबेडकरांनी वर्ण व्यवस्थेची कट्टर आलोचना केलेली आहे. त्यांच्या मते–

4. वर्ण व्यवस्था अवैज्ञानिक, अमानवीय, अलोकतांत्रिक, अनैतिक, अन्यायपूर्ण आणि शोणकारी सामाजिक व्यवस्था आहे.

ISSN 2231-1629
Knowledge Resonance
IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

5. समाजात दिसून येणारी असष्यता वर्ण यवस्थेचा अनिवार्य परिणाम आहे. त्यामुळे वर्ण व्यवस्थेला समुळ नट केल्याषिवाय समाजात दिसून येणाऱ्या अस्पष्यतेच्या भावनेला दूर करता येणार नाही.
6. चतुर्वर्ण प्रणाली वैज्ञानिक नाही. कारण गुणवत्तेच्या आधारे समाजाचे वर्गीकरण करता येत नाही. वस्तूस्थिती ही आहे की व्यक्तीचे स्वरूप नेहमीच बदलते, म्हणून वर्णन केलेल्या गुणांची संबंधित स्थिती देखील नेहमीच बदलत राहाते. या व्यतिरिक्त, चातुर्वर्ण प्रणाली व्यक्तीमध्ये परावलंबन प्रोत्साहित करते.
7. एखाद्या व्यक्तीच्या नैसर्गिक गुणांकडे दुर्लक्ष करणे आणि त्याला वर्णांच्या क्रियाकलापांमध्ये सामील करणे म्हणजे व्यक्तीच्या नैसर्गिक आणि सर्वांगीण विकासाला कुंठीत करणे होय.
8. या व्यतिरिक्त वर्ण प्रणालीतून सामाजिक भेदभाव उद्‌भवू शकतो आणि समाज व्यवस्थेमध्ये समान कार्यासाठी वेगवेगळे उपक्रम आणि नियम वेगवेगळ्या वर्गासमवेत लागू करणे मानवतावादाला कलंकित करणारे आहे. अषी वाईट सामाजिक व्यवस्था भारतीय समाज वगळता इतर कोणत्याही समाजात अस्तित्त्वात असलेली दिसून येत नाही.
9. वर्ण व्यवस्थेमुळे व्यक्ती विषयी द्वेषाची भावना निर्माण होते.
10. वर्ण व्यवस्थेप्रमाणेच आश्रम व्यवस्था सुध्दा वर्तमान काळात उपयुक्त ठरू शकत नाही.
11. आश्रमांची जागा आज शैक्षणिक संस्था आणि विष्वविद्यालय यांनी घेतली आहे. तीथे सर्व वर्गातील लोकांना, मुले–मुलिंना समान वागणूक दिली जाते. त्यामुळे प्राचीन काळातील आश्रम व्यवस्था उपयुक्त ठरत नाही.
12. वर्तमान काळात ब्रह्मचर्य, वानप्रस्थ आणि सन्यास आश्रमाचे जीवनशक्य नाही. या काळात मनुष्य आधुनिक सुखसोयींची अपेक्षा करतो. आधुनिक संन्यासी देखील सुखमय जीवन जगणे पसंत करतात. आध्यात्माची जागा विज्ञानाने घेतली आहे. अषा परिस्थितीत आश्रमाची संकल्पना निशफळ ठरते.

**निकर्ष :** चातुर्वर्ण व्यवस्था केवळ मानवी समाजासाठी अव्यवहार्यच नाही तर ती हानिकारक देखील आहे. म्हणजे काही मुठभर लोकांच्या वर्चस्वासाठी बऱ्याच लोकांना सर्वहारा बनविण्यात आले. काही लोकांच्या जीवनाच्या विकासासाठी आणि प्रकाषासाठी बऱ्याच लोकांना उदासीन, निराधार आणि गडद करण्यात आले. हे सर्व भारतातच घडले आहे. या राक्षसी व्यवस्थेमुळे इथले बहुसंख्य लोक निर्जीव व अपंग बनले आहे. हेच कारण आहे की इतर समृद्ध देषांप्रमाणे आपल्या देषात सामाजिक क्रांती कधीही झाली नाही. येथील लोकांमध्ये गुलामगिरीतून मुक्त होण्याचे कोणतेही साधन नव्हते. त्यांना सांगण्यात आले की ईष्वरानेच तुमच्या नषिबात गुलामगिरी लिहिली आहे. याचा परिणाम म्हणजे ज्या लोकांना शूद्र बनविले गेले त्यांना ढोबळ गुलामगिरीचे दुःख भोगावे लागले.

आज आपल्याला वर्ण व्यवस्थारहीत एका आदर्ष समाजाची आवष्यकता आहे. अर्थात ज्या समाजात न्याय, बंधुता, समता आणि स्वातंत्र्य आहे तोच खऱ्या अर्थाने आदर्ष समाज आहे. बंधुत्वाचा अर्थ असा आहे की देषात जन्मलेले सर्व लोक बंधू आहेत आणि देषाच्या मालमत्तेवर वडिलांच्या मालमत्तेप्रमाणेच समान अधिकार आहेत. आयुष्यासाठी आवष्यक असलेले अन्न, निवास, औषध आणि षिक्षणावर सर्वांचा समान हक्क आहे. समता म्हणजे सर्वांना समानतेची वागणूक. ही वास्तविकता आहे की सर्व व्यक्ती एकसमान नसतात. प्रत्येक व्यक्ती हा विषेष आणि प्राकृतिक रूपाने दुसऱ्या व्यक्ती पासून भिन्न असतो. परंतु या विषेष आणि प्राकृतिक असमानतेमुळे त्या व्यक्तींमध्ये व्यवहारातसुध्दा असमानता आणने न्याययुक्त नाही. प्रत्येक व्यक्तिला त्याच्यात असलेल्या शक्तीच्या पूर्ण विकासाकरीता समान भावनेने प्रोत्साहन आणि सुविधा उपलब्ध व्हायला पाहीजे. त्याचप्रमाणे मनुष्य हा स्वतंत्र असून प्रत्येक व्यक्तीने त्याच्या स्वातंत्र्याचा सम्मान कायला पहिजे. स्वातंत्र्याचे तत्व असे सांगते की, प्रत्येक व्यक्तीला त्याच्या इच्छेनुसार व्यवसाय आणि आचरण करण्याचे स्वातंत्र आहे. वर्ण व्यवस्थेनुसार कर्म करण्याची व्यवस्था ही एक केवळ कायदेषीर गुलामगीरीची प्रथा आहे.

आश्रम व्यवस्थेबद्‌दल आपण असे म्हणू की, प्राचीन काळातील आश्रम व्यवस्था वर्तमान काळात जषीच्या तषी स्वीकार करता येत नाही. परंतु चार आश्रमापैकी ब्रह्मचर्य आश्रमातील विचार पध्दती एक संयम पध्दती म्हणून आपण स्वीकारू ाकतो. वर्तमान काळात ब्रह्मचर्य व्रताचे काटेकोरपणे पालन करणे शक्य नसले तरी समाजामध्ये राहण्याकरीता आत्मसंयमाची नितांत आवष्यकता आहे. जेंव्हा समाजातील संयम नष्ट होतो तेंव्ही समाजाचे अधपतन होते. असंयमित जीवन हे प्राण्यांच्या जीवनाप्रमाणे असते आणि म्हणून निरोगी समाजाची रचना संयमाषिवाय ाक्य नाही. तसेच जीवनात शांती आणि समाधान मिळविण्याकरीता गृहस्थ जीवनातून वेळ काढून परोपकार आणि आध्यात्मिक चिंतन करणे गरजेचे आहे.

### *संदर्भ ग्रंथ सूची*


1. *पाठक, दिवाकर .2000. भारतीय नीतिशास्त्र, बिहारः बिहार हिंदी ग्रंथ अकादमी.*
2. *वर्मा, अशोक कुमार .2005. नीतिशास्त्र की रूपरेखा (पाश्च्यात्य और भारतीय), वाराणसीः मोतीलाल बनारसीदास*
3. *मिश्र, हदय नारायण, अवस्थी, जमना प्रसाद .1988. नीतिशास्त्र की भूमिका, चण्डीगढः हरियाणा साहित्य अकादमी*
4. *कुलकर्णी, डॉ. वैशाली .2016. भारतीय नीतिषास्त्र, नागपूरः विश्व पब्लिशर्स ॲण्ड डिस्ट्रिब्यूटर्स*
5. *जोशी प्रा. विद्या. 2004. भारतीय व पाश्च्यात्य नीतिशास्त्र, नागपूरः विद्या प्रकाशन*